सदरक्षणाय खलनिग्रहणाय


महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in


---

जा.क्र. ९८६/वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- १८/१२/२०२१

## —: प्रेस नोट :—

### पायधुनी पोलीस ठाणे, निर्भया पथक यांची अभिमानास्पद कामगिरी

पायधुनी पोलीस ठाणेच्या पायधुनी-५ या 'निर्भया' मोबाईल वाहनावरील स.पो.नि रत्ना खंडेलवाल व पथक म.पो.ह. ९६१८४०/ लोखंडे, पो. ना. ९९०६२७/ देशमुखे, पो. ह. ३०५६६ / मोहिते हे पायधुनी पोलीस ठाणे हद्दीमध्ये गस्त करीत असताना दि.१४/१२/२०२१ रोजी दुपारी १५:२५ वाजताच्या सुमारास नवरत्न बिल्डिंग, पी डिमेलो रोड ,मुंबई येथे एक अंदाजे ८५ वर्षाची वृद्ध महिला रडत असल्याचे त्यांना आढळुन आले. सदरवेळी त्यांचेकडे नमुद पथकाने चौकशी केली असता त्या कोणतीही माहीती देवू शकल्या नाही.

नमूद पथकाने त्वरीत कार्यवाही करून आजुबाजुस चौकशी केली असता नमुद महिलेस कोणीतरी तेथे सोडून गेल्याचे माहिती मिळाली. परंतु सदरच्या वयोवृध्द महिलेच्या नातेवाईकांन बाबत कोणतीही माहिती मिळून आली नाही. त्यामुळे पथकाने नमुद महिलेस सुरक्षितरित्या तात्पुरत्या स्वरूपात पायधुनी पोलीस ठाणेस ठेवुन पोलीस ठाणे हद्दीमध्ये तिच्या नातेवाइकांबाबत माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरु केला. सदर वृध्द महिलेचे नातेवाईक सेंट जॉर्ज हॉस्पिटल, रेल्वे चाळ, बाल मंदिर चाळ, रूम नं. १५, मुंबई येथे राहत असले बाबत माहिती मिळाली. त्यावर नमुद वृध्द महिलेस त्यांची नात व सून यांच्या ताब्यामध्ये सुखरूपपणे सोपविले. अशा रितीने निर्भया पथकाने कोणचीही कसलीही तक्रार नसतानासुध्दा हरविलेल्या ८५ वर्षाच्या वयोवृध्द महिलेस तात्काळ कार्यवाही करून काही तासांच्या आत नातेवाईकांचा शोध घेवुन त्यांच्याकडे सुखरूपपणे पोहचविल्यामुळे मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचावली आहे.

(चैतन्या एस्.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner